# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०६/०७/२०२६ (सोमवार )

## पोलीस ठाणे पाचगाव हद्दीत मौजा चांपा पारधी बेडा येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू साठविणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ०१ लाख ३३ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांची कामगिरी

पोलीस स्टेशन पाचगाव :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार वरीष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक ०६/०७/२०२६ रोजी मध्यरात्री दरम्यान श्री. संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी कन्हान विभाग हे जिल्हा गस्त दरम्यान अवैध धदंयावर कारवाई कामी गस्त करीत असतांना त्यांना गोपनिय माहीती प्राप्त झाली की, पाचगाव पोलीस स्टेशन हद्दीतील मौजा चांपा बेडा येथे राहणारा राहुल वरदास पवार याने अवैध्यरित्या मोहाफुल गावठी दारूची त्याच्या घरात साठवुन ठेवली आहे. अशा खबरे वरून सापळा रचुन श्री संतोष गायकवाड हे पाचगाव पोलीस आणि दंगा नियंत्रण पथक यांच्यासह मौजा चांपा बेडा **येथे आरोपी नामे राहुल पवार याच्या घराची पंचासमक्ष झडती घेतली नमुद ठिकाणी मोहाफुल गावठी दारू तसेच मोहाफुल रसायन सडवा तसेंच प्लॅस्टीक ड्रम व इतर साहित्य मिळुन आले.**

**पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण १२० लिटर मोहाफुल गावठी दारू तसेच ३००० लिटर मोहाफुल रसायन सडवा असा एकुण १,३३,५००/— रूपयांचा माल जप्त केला. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. असता राहुल वरदार पवार, वय ४५ वर्ष, रा. चांपा पारधी बेडा, ता. उमरेड, जि. नागपूर याचेवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**







# शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी नागपूर ग्रामीण जिल्हयात शालेय बस/वाहन चालकांच्या विशेष बैठका आणि उपाययोजना

शाळा सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीच्या अनुषंगाने मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक ०६/०७/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हयातील पोलीस स्टेशन कन्हान, पाचगाव, कोंढाळी , सावनेर, कळमेश्वर यांनी शाळा बस आणि संबधित इतर वाहन चालक, वाहक तसेच संबंधित शाळांच्या प्रतिनिधींच्या विशेष बैठका आयोजित करण्यात आल्या. पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत नारायणा शाळा, विकास शाळा आणि धर्मराज शाळा यांची बैठक घेण्यात आल्या तसेच पोलीस स्टेशन पाचगाव अंतर्गत सेंट पॉल हायस्कुल, धामना आणि गोविंदराव वंजारी इंजिनियरींग कॉलेज यांची बैठक घेण्यात आली. पोलीस स्टेशन कोंढाळी अंतर्गत लखोटिया भुतडा विद्यालय कोंढाळी, अरविंद इंडो पब्लिक स्कूल कोंढाळी येथे बैठक घेण्यात आली. पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत के जॉन पब्लिक स्कूल, आजनी (सावनेर), सारस्वत सेंट्रल पब्लिक स्कूल, आजनी (सावनेर) आणि रॉयल इंटरनॅशनल स्कूल सावनेर येथ यांची बैठक घेण्यात आली. पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत सेंट जोसेफ स्कूल, आणि जे डी इंजिनिअरिंग कॉलेज यांची बैठक घेतली.

सदर बैठकांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीस सर्वोच्च प्राधान्य देत शाळा व्यवस्थापनाला शालेय बसची फिटनेस, विमा, परवाना व इतर आवश्यक कागदपत्रे अद्ययावत ठेवणे, बस चालक व अटेंडंट यांची चारित्र्य पडताळणी (Character Verification) करून त्यांच्या राहत्या पत्त्याची व इतर आवश्यक माहितीची नोंद ठेवणे तसेच सर्व शालेय बसमध्ये आवश्यक सुरक्षा सुविधा, प्रथमोपचार पेटी, अग्निशमन यंत्र व सीट बेल्टची व्यवस्था करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी शालेय बस चालक व अटेंडंट यांना वाहन चालविताना मोबाईलचा वापर न करणे, मद्यपान करून वाहन न चालविणे, वेगमर्यादेचे पालन करणे, विद्यार्थ्यांना सुरक्षित ठिकाणीच चढविणे व उतरविणे, वाहनाच्या खिडक्यांना आवश्यक सुरक्षा जाळी व रॉड बसविणे, पावसाळ्यात ओव्हरहेड वीजतारा, मोठी झाडे व इतर धोकादायक ठिकाणी वाहन उभे न करणे, वाहन नियंत्रित वेगाने

चालवून अचानक ब्रेक लावण्याची वेळ येणार नाही याची दक्षता घेणे तसेच सर्व वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

याशिवाय, शाळा सुरू होण्याच्या व सुटण्याच्या वेळेत शाळा परिसरात पोलीस पेट्रोलिंग वाढविण्यात आली असून वाहतूक नियंत्रणासाठी विशेष पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात आला आहे. सदर बैठकींना संबंधित पोलीस स्टेशनच्या हद्दीतील शाळांचे प्रशासकीय अधिकारी, शालेय बस चालक, वाहक व अटेंडंट उपस्थित होते.




SREE NARAYANA GURU Open AUDITOR
एक्सप्रेस


Welcome
Back To
School



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने